Celebrating Cinema
PIFF Pune International Film Festival

# आजी आणि ताईला घेऊन 'एआय'ने तयार केला 'चाय अँड सिक्रेट'

पुणे, दि. १८ फेब्रुवारी २०२५ : एका ॲप्लिकेशनवरून पटकथा तयार झाली, एका ॲप्लिकेशनवरून चित्र, एका ॲप्लिकेशनवरून व्हिडिओ, दुसऱ्या ॲप्लिकेशनवरून संगीत अजून असे बरेच काही आणि पुण्यातल्या आजी आणि ताईंना घेऊन एआयने बनवला 'चाय अँड सिक्रेट' नावाचा एक मिनिटाचा चित्रपट. एआय भविष्यात नेमके काय करणार आहे, याची झलक आज २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्स(पीफ)वात पाहायला मिळाली. स्पेनचे प्रसिद्ध दिग्दर्शक पाको टोरेस यांनी पुण्यातील ' आजी आणि ताई' अशी दोन पात्र घेऊन प्रेक्षकांच्या समोरच 'चाय अँड सिक्रेट' नावाचा एक मिनिटांचा चित्रपट तयार केला.

'पिफमध्ये चित्रपट आणि एआयचा वापर या विषयावर पाको टोरेस बोलत होते. त्यावेळी त्यांनी हा चित्रपट तयार करून एआयचे प्रात्यक्षिक दिले.

चॅट जीपीटीवर त्यांनी पटकथा तयार केली. तिथेच त्यांनी 'आजी आणि ताई' यांची चित्रे तयार केली. नंतर मिडजर्नीसाठी प्रॉम्प्ट तयार केले ते मिडजर्नीवर टाकून व्हिडिओ तयार केले. ते क्रेयावर टाकून अधिक उच्च दर्जाचे केले. क्लिंग वापरून पार्श्वसंगीत आणि पुण्यातील काही आवाज तयार केले. उडीओ आणि पिक्सिबे वरून सतारचे संगीत घेतले. हे सगळे एकत्रित करून त्याचा एक मिनिटांचा चित्रपट तयार केला.

ते म्हणाले, की एआयला आता पर्याय नाही, पण ते मानवी मेंदूला पर्याय ठरू शकत नाही. एआयमुळे चित्रपट सृष्टीचे नुकसान होणार नाही. अधिक फायदाच होईल. ते म्हणाले, “आपण नव्या जगात आहोत. या नव्या जगात गोष्टी वेगाने घडत आहेत. एआय उपयोग गोष्टी वेगाने घडवण्यासाठी होतो. त्यातून नव्याने गोष्टी घडतील. “

त्यांनी सांगितले, की एआयचा वापर करून, बॉट, मशीन लर्निंग, टेक्स्ट, इमेज, व्हॉईस, संगीत, व्हिडिओ, पॉडकास्ट, सबटायटल, प्रोग्राम कोड तयार करता येऊ शकते. ते शेवटी म्हणाले, “लक्षात ठेवा एआय सहचालक आहे, चालक मात्र तुम्हीच आहात.”